जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांना आपत्तीच्या अनुषंगाने "पूर्वतयारी व क्षमताबांधणी" करीता सन २०२६-२७ करीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
मदत व पुनर्वसन विभाग
शासन निर्णय क्र.आव्यप्र-२०२६/प्र.क्र.६४/आपत्ती-१/ई-१६३२३९९
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई :- ४०० ०३२.
दिनांक : १४ जुलै, २०२६

संदर्भ :-

१. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि.९ एप्रिल, २०२६
२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.आव्यप्र-२०२५/प्र.क्र.२५/आव्यप्र-१, दि.०९ मे, २०२५
३. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.आव्यप्र-२०२४/प्र.क्र.९३/आव्यप्र-१, दि.११ जुलै, २०२४

प्रस्तावना:-

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या तरतूदीनुसार मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे. आपत्ती प्रसंगी प्रतिसाद देणाऱ्या यंत्रणांचे सक्षमीकरण करणे ही प्राधिकरणाची मुख्य जबाबदारी आहे. तसेच या अधिनियमाच्या कलम २२ व २४ मध्ये राज्य कार्यकारी समितीच्या जबाबदाऱ्या नमूद केल्या आहेत. यामध्ये आपत्तीला सक्षमपणे तोंड देण्याकरीता करावयाच्या उपाययोजना व कार्ये नमूद करण्यात आली आहेत. संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने करावयाच्या खर्चा संदर्भात विहित मानके निर्गमित करण्यात आली आहेत. त्यानुसार खर्च करणे आवयश्यक आहे.

त्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांना सन २०२६-२७ करीता निधी वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम ३१ प्रमाणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करुन त्यानुषंगाने आपत्ती व्यवस्थापनांतर्गत आपत्तीमुळे निर्माण होणारे धोके व नुकसान कमी करण्याकरिता उचित प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यानुषंगे संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णयान्वये निर्गमित मानंकानुसार कार्यवाही करण्यासाठी सर्व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांना शासन निर्णय सोबतचे परिशिष्ट "अ" प्रमाणे जिल्हानिहाय एकूण रू.२३,००,००,०००/- (अक्षरी रू. तेवीस कोटी फक्त) इतका निधी वितरीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी वितरीत आहरीत करण्यासाठी संबंधित निवासी उपजिल्हाधिकारी यांना "आहरण व संवितरण अधिकारी" व जिल्हाधिकारी यांना "सनियंत्रण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. निधी वितरणाकरीता खालील अटी व शर्ती लागू राहतील. :-

अटी व शर्ती :-

१) सदर आदेशान्वये वितरीत करण्यात आलेला निधी सं.क्र.२ च्या शासन निर्णय दि.११.०७.२०२४ अन्वये विहित केलेल्या मानक कार्यपद्धतीप्रमाणे खर्च करावा.
२) निधीचा विनियोग करताना सं.क्र.१ वित्त विभागाच्या शासन परिपत्रकामधील अटींची पूर्तता होईल याची दक्षता घेण्यात यावी.

३) आपत्कालीन परिस्थितीत अथवा आकस्मिक बाबीवर शासनामार्फत उपरोक्तप्रमाणे ठरवून दिलेल्या खर्च मर्यादेपेक्षा जास्त खर्च करणे आवश्यक असल्यास त्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची पूर्वमंजूरी अथवा कार्योत्तर मंजूरी घेणे आवश्यक राहील.

४) अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध असलेला निधी कोषागारातून आहरित करण्यापूर्वी तसेच खर्च करताना राज्य शासनाची कार्य नियमावली, वित्तीय नियमावली, अर्थसंकल्पीय नियम पुस्तिकेतील तरतूदी व सर्व अटी/ शर्तीचे पालन करावे.

५) वितरीत करण्यात आलेला निधी झालेल्या खर्चानुसार NDMIS या पोर्टलवर विनाविलंब भरण्यात यावा. त्याशिवाय पुढील / अतिरिक्त निधीची मागणी विचारात घेतली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

६) निधीच्या विनियोगाची तपशीलवार माहिती, अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल, उपयोगिता प्रमाणपत्र या आवश्यक बाबी आर्थिक वर्ष संपल्यानंतर ३० दिवसांच्या आत जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या मान्यतेने शासनास सादर करणे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांना बंधनकारक राहील.

३. या कामी होणारा खर्च मागणी क्र. सी-६ (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१) (०१) पूर्व तयारी व क्षमताबांधणी (२२४५४१८८) (वित्त आयोग)(अनिवार्य), ३१-सहाय्यक अनुदान (वेतनेतर) (सशर्त) या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या वित्तीय वर्षाकरीता अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या व उपलब्ध असलेल्या तरतूदीतून खर्च करण्यात येईल .

४. सदर शासन निर्णय वित्त विभाग अनौसं.क्र.३८०/२०२६/व्यय-९, दि.०९.०७.२०२६ अन्वये तसेच दिलेली मान्यता व सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२६०७१४१८२६५७१२४१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RATANSINGH MAHAJAN PARDESHI
Date: 2026.07.14 18:28:09 +05'30'

(रतनसिंह परदेशी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१. मा. मंत्री (आपत्ती व्यवस्थापन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (वित्त व्यय) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव (आ.व्य., म. व पु.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
४. आयुक्त, मुंबई महानगरपालिका.
५. अध्यक्ष, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, बृहन्मुंबई.
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
७. महालेखापाल (लेखापरिक्षा), मुंबई/नागपूर.
८. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. विभागीय आयुक्त (सर्व).
१०. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण (सर्व).
११. सह सचिव तथा वित्तीय सल्लागार, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. उप सचिव (अर्थ/व्यय-९), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नवसन, मंत्रालय, मुंबई.
१४. निवड नस्ती (आपत्ती-१).

शासन निर्णय, मदत व पुनर्वसन विभाग क्र. आव्यप्र-२०२६/प्र.क्र.६४/आपत्ती-१/ई-१६३२३९९ दि.१४/७/२०२६ सोबतचे परिशिष्ट “अ”

(रु. लाखात)

अ.क्र	विभाग	जिल्हा	सन २०२६-२७ करीता वितरीत निधी
१	**कोकण**	मुंबई शहर	५०
२		मुंबई उपनगर	५०
३		ठाणे	१००
४		पालघर	१००
५		रायगड	१००
६		रत्नागिरी	१००
७		सिंधुदुर्ग	१००
८	**पुणे**	पुणे	१००
९		सातारा	५०
१०		सांगली	५०
११		सोलापूर	१००
१२		कोल्हापूर	७५
१३	**नाशिक**	नाशिक	१००
१४		नंदुरबार	५०
१५		धुळे	५०
१६		जळगाव	५०
१७		अहिल्यानगर	५०
१८	**छत्रपती संभाजीनगर**	छ. संभाजीनगर	५०
१९		जालना	५०
२०		बीड	५०
२१		परभणी	५०
२२		हिंगोली	५०
२३		धाराशिव	५०
२४		लातूर	५०
२५		नांदेड	५०
२६	**अमरावती**	अमरावती	५०
२७		अकोला	५०
२८		वाशिम	५०
२९		बुलढाणा	५०
३०		यवतमाळ	५०
३१	**नागपूर**	नागपूर	१००
३२		वर्धा	५०
३३		भंडारा	५०
३४		गोंदिया	५०
३५		चंद्रपूर	७५
३६		गडचिरोली	५०
एकूण			२३००